श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

UG- 11.27 षष्ठः सोपान



स्व धाम प्रस्थान को देखो हो रहे श्रीकृष्ण तैयार ।
उद्धृत किए उद्धव समक्ष अद्भुत अनमोल उद्गार ।।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
एकादशः स्कन्धः
॥ सप्तविं(म्)शोऽध्यायः ॥

उद्धव उवाच

क्रियायोगं(म्) समाचक्ष्व, भवदाराधनं(म) प्रभो ।
यस्मात्त्वां(यँ) ये यथार्चन्ति, सात्वताः(स्) सात्वतर्षभ ॥ 1॥

उद्धव म्हणाला - हे भक्तवत्सल श्रीकृष्णा ! जे भक्तजन ज्या प्रकारे ज्या उद्देशाने आपली पूजा अर्चा करतात, तो आपल्या आराधनेचा क्रियायोग आपण मला सांगा.

एतद् वदन्ति मुनयो, मुहुर्निः(श्) श्रेयसं(न्) नृणाम् ।
नारदो भगवान् व्यास, आचार्योऽङ्गिरसः(स्) सुतः ॥ 2॥

देवर्षी नारद, भगवान गॅस आणि आचार्य बृहस्पती इत्यादी मुनी वारंवार हेच मनुष्याच्या परम कल्याणाचे साधन आहे, असे सांगतात.

निः(स्)सृतं(न्) ते मुखाम्भोजाद्, यदाह भगवानजः ।

पुत्रेभ्यो भृगुमुख्येभ्यो, देव्यै च भगवान् भवः ॥ 3॥

सर्वप्रथम आपल्याच मुखा रविंदातून बाहेर पडलेला हा क्रियायोग ब्रह्मदेवांनी भृगू इत्यादी पुत्रांना आणि भगवान शंकरांनी पार्वती देवीला सांगितला होता.

एतद् वै सर्ववर्णाना- माश्रमाणां(ञ्) च सम्मतम् ।

श्रेयसामुत्तमं(म्) मन्ये, स्त्रीशूद्राणां(ञ्) च मानद ॥ 4॥

ही मर्यादारक्षक प्रभू ! हाच क्रियायोग सर्व वर्ण आणि सर्व आश्रमांच्यासाठी उपयुक्त असून परम कल्याणकारी आहे, असे मी समजतो, किंबहुना स्त्री शूद्रासाठी सुद्धा हा सर्वश्रेष्ठ उपाय असावा.

एतत् कमलपत्राक्ष- कर्मबन्धविमोचनम् ।

भक्ताय चानुरक्ताय, ब्रूहि विश्वेश्वरेश्वर ॥ 5॥

हे कमलनयन श्यामसुंदरा! आपण शंकर इत्यादी जगदीश्वरांचेसुद्धा ईश्वर आहात आणि मी आपलाच प्रेमी भक्त आहे. म्हणून कर्म बंधनातून मुक्त करणारा हा विधी आपण मला सांगावा.

श्रीभगवानुवाच

न ह्यन्तोऽनन्तपारस्य, कर्मकाण्डस्य चोद्धव ।

सं(ञ्)क्षिप्तं(वँ) वर्णयिष्यामि, यथावदनुपूर्वशः ॥ 6॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले - उद्धवा! कर्मकांडाच्या विस्ताराला काही मर्यादाच नाही, म्हणून मी थोडक्यात पहिल्यापासून याचे वर्णन करतो.

वैदिकस्तान्त्रिको मिश्र, इति मे त्रिविधो मखः ।

त्रयाणामीप्सितेनैव, विधिना मां(म्) समर्चयेत् ॥ 7॥

वैदिक, तांत्रिक आणि मिश्र असे माझ्या पूजेचे तीन विधी आहेत. या तिन्ही पैकी जो अनुकूल वाटेल, त्या विधीने भक्ताने माझी आराधना करावी.

यदा स्वनिगमेनोक्तं(न्), द्विजत्वं(म्) प्राप्य पूरुषः ।

यथा यजेत मां(म्) भक्त्या, श्रद्धया तन्निबोध मे ॥ 8॥

माणसाने आपल्या अधिकारानुसार सर्वप्रथम शास्त्रोक्त विधीने द्विजत्व प्राप्त करून घ्यावे. नंतर श्रद्धा आणि भक्तीने युक्त होऊन कोणत्या प्रकारे माझी पूजा करावी, ते तू माझ्याकडून समजून घे.

अर्चायां(म्) स्थण्डिलेऽग्नौ वा, सूर्ये वाप्सु हृदि द्विजे ।

द्रव्येण भक्तियुक्तोऽर्चेत् - स्वगुरुं(म्) माममायया ॥ 9॥

भक्तीपूर्वक निष्कपट भावाने आपला पिता आणि गुरुरूप अशी माझ्या तुझ्या सामग्रीने मूर्ती, वेदी, अग्नी, सूर्य, पाणी, हृदय किंवा ब्राह्मण या ठिकाणी भावना करून आराधना करावी.

पूर्वं(म्) स्नानं (म्) प्रकुर्वीत, धौतदन्तोऽङ्गशुद्धये ।

उभयैरपि च स्नानं(म्), मन्त्रैर्मृद्ग्रहणादिना ॥ 10॥

उपासकाने सकाळी दात घासून शरीरशुद्धीसाठी अगोदर स्नान करावे आणि नंतर वैदिक व तांत्रिक मंत्रांनी माती, भस्म इत्यादी लावून पुन्हा स्नान करावे.

सन्ध्योपास्त्यादिकर्माणि, वेदेनाचोदितानि मे ।

पूजां(न्) तैः(ख्) कल्पयेत् सम्यक्, सं(ङ्)कल्पः(ख्) कर्मपावनीम् ॥ 11॥

यानंतर वेदोक्त संध्यावंदन इत्यादी नित्यकर्म करावे. त्यानंतर माझ्या आराधनेचाच दृढ संकल्प करून वैदिक आणि तांत्रिक विधींनी कर्मबंधनातून सोडविणारी माझी पूजा करावी.

शैली दारुमयी लौही, लेप्या लेख्या च सैकती ।

मनोमयी मणिमयी, प्रतिमाष्टविधा स्मृता ॥ 12॥

पाषाण, लाकूड ,सुवर्ण माती, चित्र, वाळू ,मन आणि रत्न असे माझ्या मूर्तींचे आठ प्रकार आहेत.

चलाचलेति द्विविधा, प्रतिष्ठा जीवमन्दिरम् ।

उद्वासावाहने नैं स्तः(स्), स्थिरायामुद्धवार्चने ॥ 13॥

स्थिर आणि अस्थिर अशा दोन प्रकारच्या प्रतिमा हे माझे मंदिर होय. उद्धवा! स्थिर प्रतिमेची पूजा करताना दररोज आवाहन आणि विसर्जन करू नये.

अस्थिरायां(वँ) विकल्पः(स्) स्यात्, स्थण्डिले तु भवेद् द्वयम् ।

स्नपनं(न्) त्वविलेप्याया- मन्यत्र परिमार्जनम् ॥ 14॥

अस्थिर प्रतिमेच्या बाबतीत आवाहन -विसर्जन करावे किंवा करू नये. परंतु वाळूच्या प्रतिमेचे मात्र केले पाहिजे. माती, चित्र इत्यादी प्रतिमांवर फुलाने पाणी शिंपडावे. इतर सर्व प्रकारच्या मूर्तींना मात्र स्नान घालावे.

द्रव्यैः(फ्) प्रसिद्धैर्मद्यागः(फ्), प्रतिमादिष्वमायिनः ।

भक्तस्य च यथालब्धैर्- हृदि भावेन चैव हि ॥ 15॥

प्रतिमा इत्यादींमध्ये सुप्रसिद्ध पदार्थांनी माझी पूजा करावी. परंतु निष्काम भक्तांनी मिळेल त्या वस्तूंनी पूजा करावी किंवा हृदयामध्ये मानसिक पूजा करावी.

स्नानालं(ङ्)करणं(म्) प्रेष्ठ- मर्चायामेव तूद्धव ।

स्थण्डिले तत्त्वविन्यासो, वह्नावाज्यप्लुतं(म्) हविः ॥ 16॥

ही उद्धवा! मूर्तीलाच स्नान, वस्त्र ,अलंकार इत्यादी घालावेत स्थंडिलावर मंत्रांनी अंगदेवता आणि प्रमुख देवतांची स्थापना करून पूजा करावी. तसेच अग्नीमध्ये पूजा करावयाची असेल तर तूपमिश्रित हविर्द्रव्याच्या आहुती द्याव्यात.

सूर्ये चाभ्यर्हणं(म्) प्रेष्ठं(म्),सलिले सलिलादिभिः ।

श्रद्धयोपाहृतं(म्) प्रेष्ठं (म्), भक्तेन मम वार्यपि ॥ 17॥

भूर्यप्यभक्तोपाहृतं(न्), न मे तोषाय कल्पते ।

गन्धो धूपः(स्) सुमनसो, दीपोऽन्नाद्यं(ञ्) च किं(म्) पुनः ॥ 18॥

सूर्याला अर्घ्य ,उपस्थान अत्यंत प्रिय आहे .तसेच पाण्यामध्ये पाण्याने तर्पण इत्यादीच मला प्रिय आहे. अभक्ताने मला पुष्कळ काही दिले तरी त्यांनी संतुष्ट होत नाही .परंतु माझ्या भक्ताने मला श्रद्धेने पाणी सुद्धा अर्पण केले तरी मला ते अत्यंत आवडते. तर मग गंध, फुले, धूपदीप, नैवेद्य इत्यादी अर्पण केले तर काय सांगावे.

शुचिः(स्) सम्भृतसम्भारः(फ्),प्राग्दर्भैः(ख्) कल्पितासनः ।

आसीनः(फ्) प्रागुदग् वार्चे- दर्चायामथ सम्मुखः ॥ 19॥

उपासकाने अगोदर पूजेची सामग्री एकत्रित करून ठेवावी. नंतर पूर्वेकडे टोक असलेली कुशासन अंथरून, पूर्वेकडे किंवा उत्तरेकडे तोंड करून त्यावर बसावे. मूर्ती स्थिर असेल तर तिच्यासमोर बसावे. नंतर पूजा सुरू करावी.

कृतन्यासः(ख्) कृतन्यासां(म्),मदर्चां(म्) पाणिना मृजेत् ।

कलशं(म्) प्रोक्षणीयं(ञ्) च, यथावदुपसाधयेत् ॥ 20॥

प्रथम अंगन्यासआणि करन्यास करावे. नंतर मूर्तीमध्ये मंत्रन्यास करून हाताने निर्माल्य काढून मूर्ती पुसून घ्यावी. नंतर भरलेला कलश, प्रोक्षणपात्र इत्यादींची पूजा करावी.

तदद्भिर्देवयजनं(न्), द्रव्याण्यात्मानमेव च ।

प्रोक्ष्य पात्राणि त्रीण्यद्भिस्- तैस्तैर्द्रव्यैश्च साधयेत् ॥ 21॥

प्रोक्षणपात्रातील पाण्याने पूजेची सामग्री आणि आपले शरीर यावर प्रोक्षण करावे. त्यानंतर पाद्य, अर्ध्य व आच- मनासाठी, कलशांमधून तीन पात्रात पाणी भरून घेऊन त्यात योग्य त्या वस्तू घालाव्यात.

पाद्यार्घ्याचमनीयार्थं(न्), त्रीणि पात्राणि दैशिकः ।

हृदा शीर्ष्णाथ शिखया, गायत्र्या चाभिमन्त्रयेत् ॥ 22॥

पूजा करणाऱ्याने यानंतर तिन्ही पात्रे अनुक्रमे हृदयमंत्र, शिरोमंत्र आणि शिखा मंत्राने अभिमंत्रित करून शेवटी गायत्री मंत्राने तीनही अभिमंत्रित करावीत.

पिण्डे वाय्वग्निसं(म्)शुद्धे, हृत्पद्मस्थां(म्) परां(म्) मम ।

अण्वीं(ञ्) जीवकलां(न्) ध्यायेन्- नादान्ते सिद्धभाविताम् ॥ 23॥

यानंतर प्राणायामाने प्राणवायू आणि शरीरातील अग्नी शुद्ध करून हृदय कमलामध्ये, सूक्ष्म अशा माझ्या श्रेष्ठ जीव कलेचे ध्यान करावे.जिचे सिद्धांनी ॐकारतील नादाच्या शेवटी ध्यान केले आहे.

तयाऽऽत्मभूतया पिण्डे, व्याप्ते सम्पूज्य तन्मयः ।

आवाह्यार्चादिषु स्थाप्य, न्यस्तां(ङ्)गं(म्) मां(म्) प्रपूजयेत् ॥ 24॥

भगवंताचा तेजोमय अंश माझ्या हृदयात आहे. त्या आत्मस्वरूप जीवकलेने सगळे शरीर व्यापून गेल्यावर मानसिक उपचाराने तिची पूजा करावी. त्यानंतर तन्मय होऊन आवाहन करावे आणि प्रतिमा इत्यादी मध्ये तिची स्थापना करावी. नंतर मंत्रांनी प्रतिमेवर न्यास करून माझी पूजा करावी.

पाद्योपस्पर्शार्हणादी- नुपचारान् प्रकल्पयेत् ।

धर्मादिभिश्च नवभिः(ख्), कल्पयित्वाऽऽसनं(म्) मम ॥ 25॥

पद्ममष्टदलं(न्) तत्र, कर्णिकाकेसरोज्ज्वलम् ।

उभाभ्यां(वँ) वेदतन्त्राभ्यां(म्), मह्यं(न्) तूभयसिद्धये ॥ 26॥

माझ्यासाठी धर्म इत्यादी नऊ गुणांनी युक्त आसन तयार करावे. त्या आसनावर एक अष्टदळ कमळ तयार करून त्याचा मध्यभाग पिवळा करावा. त्यावर मूर्ती ठेवून पाद्य, आचमनीय अर्घ्य इत्यादी उपचार अर्पण करावेत. याप्रमाणे भोग आणि मोक्ष प्राप्त होण्यासाठी वैदिक आणि तांत्रिक मंत्रांनी माझी पूजा करावी.

सुदर्शनं(म्) पाञ्चजन्यं(ङ्), गदासीषुधनुर्हलान् ।

मुसलं(ङ्) कौस्तुभं(म्) मालां(म्), श्रीवत्सं(ञ्) चानुपूजयेत् ॥ 27॥

सुदर्शन चक्र, पांचजन्य शंख कौमोदकी गदा, खड्ग , बाण,धनुष्य, नांगर ,मुसळ या आठ आयुधांची आठ दिशांना पूजा करावी व कौस्तुभमणी, वैजयंतीमाला आणि श्रीवत्सचिन्हाची वक्ष :स्थळावर पूजा करावी.

नन्दं(म्) सुनन्दं(ङ्) गरुडं(म्), प्रचण्डं(ञ्) चण्डमेव च ।

महाबलं(म्) बलं(ञ्) चैव, कुमुदं(ङ्) कमुदेक्षणम् ॥ 28॥

दुर्गां(वँ) विनायकं(वँ) व्यासं(वँ), विष्वक्सेनं(ङ्) गुरून् सुरान् ।

स्वे स्वे स्थाने त्वभिमुखान्, पूजयेत् प्रोक्षणादिभिः॥ 29॥

नंद, सुनंद,प्रचंड,चंड, महाबल, कुमुद आणि कुमुदेक्षण या आठ पार्षदांची आठ दिशांना, गरुडाची समोर, दुर्गा, विनायक ,व्यास आणि विष्वक्सेन यांची चार कोपऱ्यात स्थापना करून पूजा करावी. डावीकडे गुरूंची, पूर्वीदी दिशांमध्ये क्रमाने इंद्र इत्यादी आठ लोकपालांची आपल्याकडे तोंड करून स्थापना करावी व प्रोक्षण, अर्घ्य इत्यादी अर्पण करून पूजा करावी.

चन्दनोशीरकर्पूर- कुं(ङ्)कुमागुरुवासितैः ।

सलिलैः(स्) स्नापयेन्मन्त्रैर्- नित्यता विभवे सति ॥ 30॥

स्वर्णघर्मानुवाकेन, महापुरुषविद्यया ।

पौरुषेणापि सूक्तेन, सामभी राजनादिभिः ॥ 31॥

ऐपत असेल तर दररोज चंदन, वाळा ,कापूर, केशर आणि अगुरु इत्यादी सुगंधित वस्तूंनी सुवासित केलेल्या पाण्याने मला स्नान घालावे आणि त्यावेळी स्वर्ण घर्मानुवाक, महापुरुषविद्या, पुरुषसूक्त आणि राजनादी साममंत्रांनी अभिषेक करावा.

वस्त्रोपवीताभरण- पत्रस्रग्गन्धलेपनैः ।

अलं(ङ्)कुर्वीत सप्रेम, मद्भक्तो मां(यँ) यथोचितम् ॥ 32॥

माझ्या भक्ताने वस्त्र, यज्ञोपवीत ,अलंकार घालावेत .केशराने वेलबुट्टी काढावी. फुलांचा हार, चंदन इत्यादी प्रेम पूर्वक मला वाहून सुशोभित करावे.

पाद्यमाचमनीयं(ञ्) च, गन्धं(म्) सुमनसोऽक्षतान् ।

धूपदीपोपहार्याणि, दद्यान्मे श्रद्धयार्चकः ॥ 33॥

उपासकाने श्रद्धापूर्वक मला पाद्य, आचमन ,चंदन, फुले अक्षता, धूप, दीप, नैवेद्य इत्यादी वस्तू अर्पण कराव्या.

गुडपायससर्पीं(म्)षि, शष्कुल्यापूपमोदकान् ।

सं(यँ)यावदधिसूपां(श्)श्च, नैवेद्यं(म्) सति कल्पयेत् ॥ 34॥

शक्य असेल तर गुळ, खीर, तूप, करंज्या, अनरसे, मोदक ,हलवा ,दही, वरण इत्यादी विविध पदार्थांचा नैवेद्य दाखवावा.

अभ्यं(ङ्)गोन्मर्दनादर्श- दन्तधावाभिषेचनम्।

अन्नाद्यगीतनृत्यादि, पर्वणि स्युरुतान्वहम् ॥ 35॥

भगवंतांच्या मूर्तीचे दात घासावेत. तेल व उटणे लावून अभ्यंग स्नान घालावे. अंग चोळावे. आरसा दाखवावा, नैवेद्य दाखवावा आणि सामर्थ्य असेल तर दररोज किंवा उत्सवाच्या वेळी नृत्य, गीते इत्यादी सादर करावीत.

विधिना विहिते कुण्डे, मेखलागर्तवेदिभिः ।

अग्निमाधाय परितः(स्), समूहेत् पाणिनोदितम्॥ 36॥

शास्त्रोक्त विधीने तयार केलेल्या मेखला, खोली, आणि वेदीने युक्त कुंडामध्ये अग्नीची स्थापना करावी. त्यामध्ये अग्नी प्रज्वलित करून हाताने परिसमूहन करावे.

परिस्तीर्याथ पर्युक्षे- दन्वाधाय यथाविधि ।

प्रोक्षण्याऽऽसाद्य द्रव्याणि, प्रोक्ष्याग्नौ भावयेत माम् ॥ 37॥

नंतर दर्भपरिस्तणे ठेवून त्यावर पर्युक्षण करावे .यानंतर विधीपूर्वक अन्वाधान करावे. अग्नीच्या उत्तरेकडे होमाला उपयुक्त अशा ठेवलेल्या पात्रांवर व द्रव्यांवर प्रोक्षणीपात्रातील पाण्याने प्रोक्षण करावे .त्यानंतर अग्नीमध्ये माझे याप्रकारे ध्यान करावे.

तप्तजाम्बूनदप्रख्यं(म्), शं(ङ्)खचक्रगदाम्बुजैः।

लसच्चतुर्भुजं(म्) शान्तं(म्), पद्मकिं(ञ्)जल्कवाससम् ॥ 38॥

माझी शांत मूर्ती तापलेल्या सोन्याप्रमाणे चमकत आहे. चार हातामध्ये शंख, चक्र, गदा, पद्म शोध आहेत. पितांबर कमळातील केसराप्रमाणे शोभून दिसत आहे.

स्फुरत्किरीटकटक- कटिसूत्रवरां(ङ्)गदम् ।

श्रीवत्सवक्षसं(म्) भ्राजत्- कौस्तुभं(वँ) वनमालिनम् ॥ 39॥

मस्तकावर मुगुट मनगटात कडी,कमरेला करदोटा आणि बाहू मध्ये बाजूबंद झगमगत आहेत. वक्षःस्थळावर श्रीवत्साचे चिन्ह आहे. गळ्यामध्ये कौस्तुभमणी झगमगत आहे. गळ्यात वनमाळा रुळत आहे.

ध्यायन्नभ्यर्च्य दारूणि, हविषाभिघृतानि च ।

प्रास्याज्यभागावाघारौ, दत्त्वा चाज्यप्लुतं(म्) हविः ॥ 40॥

जुहुयान्मूलमन्त्रेण, षोडशर्चावदानतः ।

धर्मादिभ्यो यथान्यायं(म्),मन्त्रैः(स्) स्विष्टिकृतं(म्) बुधः ॥ 41॥

असे ध्यान करून पूजा करावी. त्यानंतर वाळलेल्या समिधांवर तुपाचा अभिघार करून त्यांच्या आहुती द्याव्या. तसेच आघार होम करून तुपाच्या दोन आहुतीने हवन करावे. त्यानंतर तूप घातलेल्या हवीर्द्रव्याने आणि "ॐ नमो नारायणाय" या अष्टाक्षरी मंत्राने किंवा पुरुष सूक्ताच्या सोळा मंत्रांनी हवन करावे. नंतर होमकर्त्यानेआणि धर्म इत्यादी देवतांना उद्देशून विधी पूर्वक मंत्रांनी हवन करावे. तसेच शेवटी स्विष्टकृत आहुती द्यावी.

अभ्यर्च्याथ नमस्कृत्य, पार्षदेभ्यो बलिं(म्) हरेत् ।

मूलमन्त्रं(ञ्) जपेद् ब्रह्म, स्मरन्नारायणात्मकम् ॥ 42॥

नंतर भगवंतांची पूजा करून त्यांना नमस्कार करावा आणि नंद- सुनंद इत्यादी पार्षदांना आठही दिशांकडे हवन क्रर्माग बली द्यावा. नंतर परब्रम्ह स्वरूप भगवान नारायणाचे स्मरण करून "ॐ नमो नारायणाय" या भगवत स्वरूप मूल मंत्राचा जप करावा.

दत्त्वाऽऽचमनमुच्छेषं(वँ), विष्वक्सेनाय कल्पयेत् ।

मुखवासं(म्) सुरभिमत्, ताम्बूलाद्यमथार्हयेत् ॥ 43॥

त्यानंतर भगवंतांना आचमन द्यावे आणि शेष नैवेद्याचा विष्वक्सेनाला नैवेद्य दाखवावा. यानंतर मुखशुद्धीसाठी सुगंधी तांबूल अर्पण करून मंत्रपुष्पे वाहावीत.

उपगायन् गृणन् नृत्यन्, कर्माण्यभिनयन् मम ।

मत्कथाः(श्) श्रावय(ञ्)छृण्वन्, मुहूर्तं(ङ्) क्षणिको भवेत् ॥ 44॥

माझ्या लीलांचे गायन करावे, त्यांचे वर्णन करावे आणि माझ्या लीलांचा अभिनय करावा. हे सर्व करताना प्रेमोन्मत होऊन नाचावे. माझ्या कथा स्वतः ऐकाव्यात आणि दुसऱ्यांना ऐकवाव्यात. आणि ते करताना प्रपंचाला काही वेळापुरते तरी विसरून जावे.

स्तवैरुच्चावचैः(स्) स्तोत्रैः(फ्), पौराणैः(फ्) प्राकृतैरपि ।

स्तुत्वा प्रसीद भगवन्- निति वन्देत दण्डवत् ॥ 45॥

प्राचीन ऋषींनी किंवा सामान्य भक्तांनी रचलेल्या लहान - मोठ्या स्तोत्रांनी माझी स्तुती करून प्रार्थना करावी की, "हे भगवान ! आपण प्रसन्न व्हावे." असे म्हणून साष्टांग दंडवत घालावा.

शिरो मत्पादयोः(ख्) कृत्वा, बाहुभ्यां(ञ्) च परस्परम् ।

प्रपन्नं(म्) पाहि मामीश, भीतं(म्) मृत्युग्रहार्णवात् ॥ 46॥

आपले मस्तक माझ्या चरणांवर ठेवावी आणि आपल्या दोन्ही हातांनी चरण धरून म्हणावे. "भगवन ! या संसार सागरात मी बुडू लागलो आहे. मृत्यू रुपी मगर माझा पाठपुरावा करीत आहे. भयग्रस्त होऊन मी आपल्याला शरण आलो आहे. हे प्रभो! आपण माझे रक्षण करावे.

इति शेषां(म्) मया दत्तां(म्), शिरस्याधाय सादरम् ।

उद्वासयेच्चेदुद्वास्यं(ञ्), ज्योतिर्ज्योतिषि तत् पुनः ॥ 47॥

अशाप्रकारे स्तुती करून मला अर्पण केलेला फुलांचा हार मोठ्या आदराने आपल्या मस्तकावर ठेवावा. नंतर विसर्जन करावयाचे असेल तर अशी भावना करावी की, प्रतिमेतून एक दिव्य ज्योत निघून ती आपल्या हृदयस्थ ज्योतीमध्ये लीन झाली आहे.

अर्चादिषु यदा यत्र, श्रद्धा मां(न्) तत्र चार्चयेत् ।

सर्वभूतेष्वात्मनि च, सर्वात्माहमवस्थितः ॥ 48॥

जेव्हा जिथे जिया प्रतिमा इत्यादी मध्ये श्रद्धा निर्माण होईल, तेव्हा, तेथे ,माझे पूजन करावे. कारण मी सर्वात्मा असल्यामुळे सर्व प्राण्यांच्या तसेच आपल्याही हृदयात आहे.

एवं(ङ्) क्रियायोगपथैः(फ्), पुमान् वैदिकतान्त्रिकैः ।

अर्चन्नुभयतः(स्) सिद्धिं(म्), मत्तो विन्दत्यभीप्सिताम् ॥ 49॥

जो मनुष्य अशा प्रकारे वैदिक, तांत्रिक पद्धतीने माझी पूजा करतो तो , हा लोक आणि परलोक अशा दोन्ही ठिकाणी इच्छित सिद्धी प्राप्त करून घेतो.

मदर्चां(म्) सम्प्रतिष्ठाप्य, मन्दिरं(ङ्) कारयेद् दृढम् ।

पुष्पोद्यानानि रम्याणि, पूजायात्रोत्सवाश्रितान् ॥ 50॥

आर्थिक सामर्थ्य असेल, तर उपासकाने सुंदर पक्के मंदिर बांधावे आणि त्यात माझ्या प्रतिमेची स्थापना करावी. सुंदर फुलांचे बगीचे लावावेत, दररोजची पूजा, यात्रा आणि उत्सवांची व्यवस्था करावी.

पूजादीनां(म्) प्रवाहार्थं(म्), महापर्वस्वथान्वहम् ।

क्षेत्रापणपुरग्रामान्, दत्त्वा मत्सार्ष्टितामियात् ॥ 51॥

जो मनुष्य विशेष उत्सव किंवा दररोजची पूजा नेहमी चालू राहावी. म्हणून शेती, बाजार, नगर किंवा गाव माझ्या नावाने करून देतो, त्याला माझ्यासारख्या ऐश्वर्याची प्राप्ती होते.

प्रतिष्ठया सार्वभौमं(म्), सद्मना भुवनत्रयम् ।

पूजादिना ब्रह्मलोकं(न्), त्रिभिर्मत्साम्यतामियात् ॥ 52॥

माझ्या मूर्तीची प्रतिष्ठापना केल्याने पृथ्वीचे एकछत्री राज्य, मंदिर बांधल्याने त्रैलोक्याचे राज्य ,पुजा इत्यादींची व्यवस्था केल्याने ब्रम्हलोक आणि हे तीनही केल्याने माझी समानता प्राप्त होते.

मामेव नैरपेक्ष्येण, भक्तियोगेन विन्दति ।

भक्तियोगं(म्) स लभत, एवं(यँ) यः(फ्) पूजयेत माम् ॥ 53॥

जो निष्कामभावाने माझी पुजा करतो, त्याला माझा भक्ति योग प्राप्त होतो आणि त्या निरपेक्ष भक्तियोगाने तो मलाच प्राप्त करुन घेतो.

यः(स्) स्वदत्तां(म्) परैर्दत्तां(म्), हरेत सुरविप्रयोः ।

वृत्तिं(म्) स जायते विड्भुग्, वर्षाणामयुतायुतम् ॥ 54॥

जो आपण दिलेले किंवा दुसऱ्याने दिलेले देवता किंवा ब्राह्मणाच्या उपजीविकेचे साधन हिरावून घेतो, तो कोट्यवधी वर्षांपर्यंत विष्ठेतील किडा होतो.

कर्तुश्च सारथेर्हेतो- रनुमोदितुरेव च ।

कर्मणां(म्) भागिनः(फ्) प्रेत्य, भूयो भूयसि तत्फलम् ॥ 55॥

जे लोक अशा कामांमध्ये मदत करतात, प्रेरणा देतात किंवा सहमत होतात, तेसुध्दा मरणानंतर वरील व्यक्तीप्रमाणेच त्या कर्माच्या फळाचे भागीदार होतात आणि त्यांचा सहभाग त्यात अधिक असेल,तर फळ सुध्दा त्यांना अधिक मिळते.

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)

सं(म्)हितायामेकादशस्कन्धे सप्तविं(म्)शोऽध्यायः

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥

